महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

Email :- roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org

Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

क्रमांक : विकाअ/शिक्षण/डीबीटी/२०२५/2926

दिनांक 28 OCT 2025

प्रति,

प्राचार्य,

सर्व तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या पदविका,पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था,

अमरावती विभाग, अमरावती.

**विषय : डीबीटी पोर्टलवरील तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांसाठीचे पात्र विद्यार्थ्यांकडून अर्ज भरुन घेण्याबाबत व अर्जांच्या तपासणीबाबत...**

**संदर्भ :** १. विभागीय कार्यालयचे पत्र क्र.विकाअ/शिक्षण/डीबीटी/२०२५/२०२५ दिनांक १६.०७.२०२५

२. विभागीय कार्यालयचे पत्र क्र.विकाअ/शिक्षण/डीबीटी/२०२५/२०४८ दिनांक १७.०७.२०२५

३. संचालनालयाचे पत्र क्र.DTEM-D१८०SCHP(MIN)/२०/२०२५-DESK१८ Date २७.१०.२०२५

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून माहिती व तंत्रज्ञान संचालनालय,मंत्रालय,मुंबई यांच्याकडून महाराष्ट्र शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांकरिता बनविण्यात आलेल्या महाडीबीटी पोर्टलव्दारे (संकेतस्थळ www.mahadbtmahait.gov.in) तंत्रशिक्षण संचालनालयाकडून खालील योजना राबविण्यात येतात.

१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
२. डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना
३. उच्च व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजना.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता डीबीटी पोर्टलवर विद्यार्थ्यांचे योजनेसाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया दि.३०.०६.२०२५ पासून सुरु झालेली आहे.

उपरोक्त संदर्भ क्र.२ च्या परिपत्रकाव्दारे, शासनाकडून लागू करण्यात आलेल्या योजनांच्या लाभाबाबतची प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्थांना, विद्यार्थ्यांसाठी शासनाच्या लागू असलेल्या योजनांची माहिती प्रवेशावेळी घेण्यात येणाऱ्या प्रशिक्षण (Orientation Programme) कार्यक्रमा दरम्यान सर्व विद्यार्थ्यांना देण्याबाबत तसेच संस्थांनी उपरोक्त योजनांबाबतची माहिती संस्थेच्या दर्शनी भागातील सूचना फलकावर व संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत व योजनेसाठी पात्र असलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांना योजनांबाबतची माहिती निदर्शनास आणून देऊन, संस्थांनी पात्र विद्यार्थ्यांचे जास्तीत जास्त अर्ज (नवीन / नुतनीकरण) प्राप्त होण्यासाठी संस्थास्तरांवर विशेष मोहिम राबवून, पात्र विद्यार्थ्यांकडून डीबीटी पोर्टलवर अर्ज भरुन घ्यावेत असे सूचित करण्यात आले होते. तरी देखील; उपरोक्त योजनांतर्गत विद्यार्थ्यांनी अर्ज भरणे व भरलेल्या अर्जांची संस्था स्तरांवर तपासणीची प्रक्रिया अत्यंत संथ गतीने होत असल्याबाबत संचालनालयाचे संदर्भिय पत्र क्र.३ नुसार कळविण्यात आलेले आहे.

तरी याबाबत कळविण्यात येते की, सर्व व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्थांनी पात्र विद्यार्थ्यांचे जास्तीत जास्त अर्ज (नवीन / नुतनीकरण) प्राप्त होण्यासाठी संस्थास्तरांवर विशेष मोहिम राबवून, पात्र विद्यार्थ्यांकडून डीबीटी पोर्टलवर अर्ज भरुन घेण्याबाबत पुन:श्च सुचित करावे. जेणेकरुन, योजनेचा लाभ जलद गतीने देण्याबाबतची पुढील कार्यवाही करता येईल. ह्य

तसेच,योजनांचे अर्ज भरताना Right to Give Up हा पर्याय निवडला तर विद्यार्थी कायम स्वरुपी योजनेच्या लाभापासून वंचित राहणार व विद्यार्थ्यांकडून निवडलेला Right to Give Up चा पर्याय हा Cancel करता येणार नाही याची जाणीव विद्यार्थ्यांना करुन देण्याबाबतची जबाबदारी संस्थेच्या प्राचार्यांची राहील याची नोंद घ्यावी.

तसेच, महाडीबीटी पोर्टलव्दारे तंत्रशिक्षण संचालनालयांमार्फत राबविण्यात येणाऱ्या, उपरोक्त योजनांच्या प्रभावी अंमलबजावणसाठी दि.२७/१०/२०२५ रोजीच्या सोबत जोडलेल्या डीबीटी डॅशबोर्डनुसार, शै.वर्षनिहाय तपशीलानुसार,संस्था स्तरांवर प्रलंबित अर्ज (Pending at Instiute अंतर्गत), विद्यार्थी स्तरांवर प्रलंबित अर्ज (Sent back अंतर्गत) व संस्था स्तरांवर दुसरा हप्ता देण्यासाठी विद्यार्थ्यांचा उपस्थिती अहवाल भरण्याची कार्यवाहीसाठी (Pending at Institute for II nd Installment) प्रलंबित असल्याचे दिसून येत आहे. सदरची प्रलंबित असलेली कार्यवाही त्या त्या संबंधित संस्थांकडून खालील तक्त्यामध्ये दिलेल्या

सूचनानुसार तात्काळ पूर्ण करुन घ्यावी. जर या कारणास्तव पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्यास याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधित संस्था प्राचार्यांची राहील.

| अ.क्र | डॅशबोर्ड रिपोर्ट | संस्थांनी करावयाची कार्यवाही |
|---|---|---|
| १ | अ) संस्था स्तरांवर तपासणीसाठी प्रलंबित अर्ज (Pending at Institute अंतर्गत) | डीबीटी पोर्टलवर, संबंधित अभ्यासक्रमांचे शुल्क मंजूर असलेल्या (संस्थेच्या प्राचार्यांनी मंजूरीसाठी भरलेले शुल्क) संस्थांनी त्यांच्या लॉगीनमध्ये अर्ज तपासणीसाठी प्रलंबित न ठेवता संबंधित योजनेच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार तपासणी (मंजूर/नामंजूर) करुन निकाली काढावेत. तसेच जर विद्यार्थी संबंधित योजनेच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार पात्र नसेल तर अर्ज Sent Back न करता संस्था स्तरांवरुन नामंजूर करावे.<br><br>तसेच, जर संस्थेमध्ये सुरु असलेल्या संबंधित अभ्यासक्रमांना लागू असलेले शुल्क डीबीटी पोर्टलवर मंजूर नसेल तर संबंधित संस्था प्राचार्यांनी अशा अभ्यासक्रमांचे लागू असलेले शुल्क डीबीटी पोर्टलवर भरुन संबंधितांकडून मंजुरीबाबतची कार्यवाही पूर्ण करुन घेऊन, विद्यार्थ्यांचे प्रलंबित अर्ज तात्काळ तपासणी (मंजूर/नामंजूर) करुन निकाली काढावेत<br><br>जर विद्यार्थ्याने अर्जामध्ये अभ्यासक्रमांबाबतची चुकीची माहिती भरली असेल तर संस्थांनी विद्यार्थ्यांचे अर्ज त्यांच्या लॉगीनमध्ये प्रलंबित न ठेवता अर्ज Sent Back करुन व संबंधित विद्यार्थ्यांला तात्काळ बोलवून अर्जांची त्रृटी दूर करुन,अर्ज पुन:श्च जमा करण्याबाबत कळविण्यात यावे जेणेकरुन कोणताही पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहाणार नाही. |
| | ब) संस्था स्तरांवर योजनेचा दुसरा हप्ता देण्यासाठी विद्यार्थ्यांचा उपस्थिती अहवाल भरणे प्रलंबित (Pending at Institute for II nd Installment) | संबंधित योजनेचा लाभाचा दुसरा हप्ता अदा करण्यासाठी, संस्थेच्या शे.वर्षनिहाय क्लार्क/प्राचार्यांच्या लॉगीन आयडी मध्ये विद्यार्थ्यांचा उपस्थिती अहवाल भरण्याबाबत वेळोवेळी उपलब्ध होणाऱ्या यादीतील विद्यार्थ्यांचा उपस्थिती अहवाल भरुन अर्ज निकाली काढावे. |
| २ | संस्थांनी विद्यार्थ्यांना परत पाठविलेले अर्ज (Sent Back अंतर्गत) | संस्थांनी पात्र विद्यार्थ्यांना तात्काळ बोलावून अर्जांची त्रृटी दूर करुन, अर्ज पुन:श्च जमा करण्याबाबत कळविण्यात यावे जेणेकरुन कोणताही पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहाणार नाही.<br><br>तसेच, जर संस्थेकडून अपात्र विद्यार्थ्यांचे अर्ज नामंजूर न करता Sent Back करण्यात आले असतील तर अशा विद्यार्थ्यांकडून संस्थेच्या लॉगीनमध्ये प्राप्त करुन घेऊन संस्था स्तरांवर कारणासह नामंजूर करावे.जेणेकरुन एकही अर्ज प्रलंबित राहाणार नाही. |

**(मनोज.म.अंधारे)**
**प्र.सहसंचालक**
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती.

**प्रत:** १. **मा.संचालक,**तंत्रशिक्षण संचालनालया,म.रा.मुंबई यांना माहिती करीता सविनय सादर.
२ .**प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय अमरावती यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करणेसाठी.

**Directorate of Technical Education** **Regionalwise/Schemewise** **DBT Portal- Date** **Date-27-10-2025**

## Amravati

| Region | Scheme | Academic Year | 1 Application Received | 2 Cancelled | 3 Net Received | 4 Rejected | 5 RightTo GiveUp | 6 Sent back to applicant | 7 Approved By Institute | 8 **Pending At Institute** | 9 Approved By Department | 10 **Pending At Department** | 39 **Pending At Institute (2nd Installment)** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Amravati | DrPunjabrao Deshmukh Vastigruh Nirvah Bhatta Yojna(DTE) | 2018-19 | 850 | 241 | 609 | 84 | 0 | 0 | 525 | 0 | 525 | 0 | 0 |
| | | 2019-20 | 1,183 | 266 | 917 | 9 | 0 | 20 | 888 | 0 | 888 | 0 | 0 |
| | | 2020-21 | 864 | 297 | 567 | 30 | 0 | 45 | 492 | 0 | 492 | 0 | 3 |
| | | 2021-22 | 1,099 | 297 | 802 | 34 | 0 | 45 | 723 | 0 | 723 | 0 | 9 |
| | | 2022-23 | 1,363 | 220 | 1,143 | 20 | 0 | 41 | 1,082 | 0 | 1,082 | 0 | 0 |
| | | 2023-24 | 1,454 | 211 | 1,243 | 10 | 0 | 29 | 1,200 | 4 | 1,200 | 0 | 11 |
| | | 2024-25 | 2,037 | 235 | 1,802 | 7 | 0 | 75 | 1,683 | 37 | 1,678 | 5 | 21 |
| | | 2025-26 | 1,255 | 68 | 1,187 | 2 | 0 | 91 | 26 | 1,068 | 22 | 4 | 0 |
| | | **Total** | **10,105** | **1,835** | **8,270** | **196** | **0** | **346** | **6,619** | **1,109** | **6,610** | **9** | **44** |
| | Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Shikshan Shulkh Shishyavrutti Yojna(EBC) | 2018-19 | 5,872 | 1,218 | 4,654 | 275 | 0 | 0 | 4,379 | 0 | 4,379 | 0 | 4 |
| | | 2019-20 | 5,400 | 799 | 4,601 | 44 | 0 | 120 | 4,437 | 0 | 4,437 | 0 | 3 |
| | | 2020-21 | 6,502 | 992 | 5,510 | 51 | 0 | 208 | 5,251 | 0 | 5,251 | 0 | 4 |
| | | 2021-22 | 6,723 | 974 | 5,749 | 80 | 0 | 120 | 5,548 | 1 | 5,548 | 0 | 0 |
| | | 2022-23 | 6,992 | 935 | 6,057 | 61 | 0 | 168 | 5,826 | 2 | 5,826 | 0 | 1 |
| | | 2023-24 | 6,521 | 760 | 5,761 | 43 | 0 | 114 | 5,582 | 22 | 5,582 | 0 | 17 |
| | | 2024-25 | 7,318 | 638 | 6,680 | 18 | 0 | 245 | 6,245 | 172 | 6,233 | 12 | 86 |
| | | 2025-26 | 3,923 | 268 | 3,655 | 1 | 0 | 206 | 1,857 | 1,591 | 475 | 1,382 | 0 |
| | | **Total** | **49,251** | **6,584** | **42,667** | **573** | **0** | **1,181** | **39,125** | **1,788** | **37,731** | **1,394** | **115** |
| | Scholarship for students of minority communities pursuing Higher and Professional courses(DTE) | 2018-19 | 2,529 | 524 | 2,005 | 199 | 0 | 0 | 1,806 | 0 | 1,806 | 0 | 4 |
| | | 2019-20 | 1,478 | 196 | 1,282 | 17 | 0 | 18 | 1,247 | 0 | 1,247 | 0 | 3 |
| | | 2020-21 | 1,810 | 208 | 1,602 | 15 | 0 | 45 | 1,542 | 0 | 1,542 | 0 | 4 |
| | | 2021-22 | 1,536 | 167 | 1,369 | 21 | 0 | 50 | 1,297 | 1 | 1,297 | 0 | 3 |
| | | 2022-23 | 1,287 | 148 | 1,139 | 23 | 0 | 39 | 1,073 | 4 | 1,073 | 0 | 1 |
| | | 2023-24 | 1,299 | 161 | 1,138 | 22 | 0 | 41 | 1,071 | 4 | 1,071 | 0 | 4 |
| | | 2024-25 | 1,227 | 133 | 1,094 | 25 | 2 | 61 | 964 | 42 | 963 | 1 | 65 |
| | | 2025-26 | 482 | 40 | 442 | 1 | 1 | 19 | 114 | 307 | 7 | 107 | 0 |
| | | **Total** | **11,648** | **1,577** | **10,071** | **323** | **3** | **273** | **9,114** | **358** | **9,006** | **108** | **84** |
| | | **Grand Total** | **71,004** | **9,996** | **61,008** | **1,092** | **3** | **1,800** | **54,858** | **3,255** | **53,347** | **1,511** | **243** |